# प्रकरण तीन

## म्हैसाळ गाव परिचय

- स्थान
- क्षेत्र
- भूपृष्ठरचना
- जमीन
- हवामान
- पीक पध्दती
- पशुधन
- वहातुक सेवा
- पाणीपुरवठा
- आरोग्यसुविधा
- ग्रामपंचायत
- शैक्षणिक सोयी
- सहकारी संस्था
- जलसिंचन
- तंत्रविज्ञान
- लोकसंख्या

# प्रकरण तिसरे

## म्हैसाळ गाव परिचय

### ३.१ भौगोलिक स्थान:

म्हैसाळ हे गाव सांगली जिल्ह्यात मिरज तालुक्यात आहे. ते सांगलीच्या पूर्वेस २०.९२ कि.मी. (१३ मैल) व मिरजेच्या दक्षिणेस ११.२६ कि.मी.(७ मैल) वर आहे. म्हैसाळ गाव सांगली जिल्ह्यातील महाराष्ट्राचे दक्षिणेकडील शेवटचे गाव असून या गावच्या दक्षिणेस ४ कि.मी. अंतरावरती कर्नाटकातील कागवाड हे गाव वसलेले आहे. पूर्वेस नरवाड पश्चिमेस ढवळी तर उत्तरेस विजयनगर ही गावे वसलेली आहेत. म्हैसाळ गावचे स्थान सोबतच्या नकाशात दाखविले आहे.

### ३.२ भूमीउपयोजन:


म्हैसाळ गावचे भौगोलिक क्षेत्र ३५५२.०० हेक्टर आहे. या एकूण क्षेत्रफळापैकी वेगवेगळ्या कारणासाठी वापर खालीलप्रमाणे -

| | हेक्टर | आर |
|---|---|---|
| १) लागवडयोग्य जमिनीचे क्षेत्र | २८७३ | ०८ |
| २) अकृषीक वापराखालील क्षेत्र | २७ | ५० |
| ३) पडीक जमिनीचे क्षेत्र | ४६२ | ४२ |
| ४) पोट खराब क्षेत्र | १०६ | ०३ |
| ५) गावठाणचे क्षेत्र | ३० | ०९ |
| ६) कुरणाचे क्षेत्र | ५२ | ८८ |

आधार : म्हैसाळ ग्रामपंचायत कागदपत्र.

वरीलप्रमाणे जमिनीचे उपयोजन झालेले दिसून येते. अलीकडील काळात जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्याने लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र दिवसे-दिवस वाढत आहे.

# MIRAJ TAHSIL



३.३ भूपृष्ठरचना:

म्हैसाळ गावची समुद्रसमापाटीपासूनची उंची १०८० फुट आहे. तर उत्तरेस जास्त उंचीचा भाग आहे. म्हैसाळच्या पूर्वेस कमी उंचीचा भाग आहे. पश्चिमे-कडून पूर्वेकडे जसजसे जावे तसतसे येथील भूभागाची उंची कमी झालेली आढळते. म्हैसाळ गावच्या उत्तर दक्षिण दिशेने कृष्णा नदी वहात गेलेली आहे. याच नदीच्या पाण्याचा वापर शेतीसाठीही केला जातो. सहकारी संस्था (साखर कारखाना) खाजगी पाणीपुरवठा योजना यांच्याद्वारे जलसिंचन सोय केलेली आहे. शिवाय विहीरीवर आधारीत जलसिंचनाची सोय केलेली आहे. १९९१ च्या आकडेवारीप्रमाणे जलसिंचनाने गावातील एकूण शेतजमिनीच्या ७५ टक्के भाग बागायत शेतीने व्यापलेला आहे.

३.४ जमीन:

हा भाग दख्खन पठाराचा आहे. बेसाल्ट किंवा अग्नीजन्य खडकाने युक्त असून याच खडकापासून तयार झालेली जमीन या गावात आढळते.

म्हैसाळ या गावातील जमीन तीन प्रकारची आहे -

१) काळी जमीन:

काळ्या जमिनीचे प्रमाण अधिक असून ती अधिक खोलीची आढळते. ही जमीन फारच उच्च दर्जाची असते. या जमिनीत सेंद्रीय द्रव्यांचे प्रमाण अधिक असून शेतीसाठी ही जमीन अत्यंत उपयुक्त असते. पण अतिरिक्त जलसिंचन किंवा पाण्याचा अयोग्य वापर यामुळे क्षारयुक्त जमीन हे म्हैसाळ गावच्या शेतीचे संकट बनले आहे.

२) तपकिरी जमिन

३) माळरान जमिन

प्रकार २ व ३ च्या क्षेत्राचे एकूण क्षेत्राशी असणारे प्रमाण अत्यल्प आहे.

३.५ हवामान:

हवामानाचा विचार केल्यास वर्ष तीन ऋतूत विभागले जाते. हा प्रदेश मोसमी हवामानाच्या पट्ट्यात येतो. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे तीन ऋतू आहेत. येथील उन्हाळा कडक असून हिवाळ्यात वातावरण सर्वसाधारण थंड असते. येथील सर्वसामान्य किमान तपमान २२$^{0}$ सेल्सीअस तर कमाल तपमान ३४$^{0}$ सेल्सीअस पर्यंत जाते. प्रसंगी हिवाळ्यात तपमान त्याहीपेक्षा खाली येते.

म्हैसाळ गावचे ऋतूचक्र खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| हिवाळा | नोव्हेंबर ते फेब्रुवारी |
| उन्हाळा | मार्च ते मे |
| पावसाळा | जून ते ऑक्टोबर |

३.६ शेती:

म्हैसाळ गाव शेतीप्रधान आहे. गावातील मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. त्यामुळे ग्रामस्थांचे आर्थिक जीवन प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या शेतीशी निगडित आहे. म्हणजेच म्हैसाळ गावची अर्थव्यवस्था संपूर्ण शेतीवर आधारीत आहे. म्हैसाळ गावचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३५५२.०० हेक्टर आहे. येथील शेतीचे महत्त्वाचे वैशिष्टय काळी जमीन व नदीच्या परिसरातील तांबडी जमीन अधिक चांगली आहे. उत्पादनाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. याचबरोबर तपकिरी व माळरान स्वरूपाच्या जमिनीत जलसिंचनाच्या आधारावर उत्तम प्रकारची द्राक्ष बागायत शेती केली जाते.

३.७ म्हैसाळ गावातील प्रमुख पिके:

ऊस, ज्वारी, भुईमूग, तांदूळ, गहू, हरभरा, द्राक्ष, बागायत, पानमळे,

सोयाबीन, सूर्यफूल, कडधान्ये, तृणधान्ये ही म्हैसाळमधील प्रमुख पिके आहेत. म्हैसाळ गावच्या शेतीचे वैशिष्टय म्हणजे जवळ जवळ सर्व प्रकारची पिके घेतली जातात. पाण्याची सोय आहे अशा ठिकाणी सर्व पिके वर्षातून दोन वेळा घेता येतात. काही वर्षापूर्वी म्हैसाळला नारळ अजिबात पिकत नव्हता. मात्र अलीकडे २ एकरामध्ये रु. ४ ते ५ हजार उत्पन्न नारळापासून मिळू लागले आहे. तसेच कंपौन्ड स्वरूपात नारळाची लावणही ब-याच ठिकाणी केली जाते. त्यामुळे इतर पिकांना काही नुकसान होत नाही. अलीकडे काही शेतक-यांनी गुलाबाच्या बागा देखील केल्या आहेत. त्यापासून उत्पन्नही चांगले मिळते.

खालील कोष्टकावरून म्हैसाळमधील पीकपध्दतीचे स्वरूप स्पष्ट होते.

म्हैसाळ गावातील एकूण शेती क्षेत्रफळाचे १अ, १ब, १क असे तीन गटात विभाजन केले असून प्रत्येक गटातील पीकपध्दती स्वतंत्रपणे दाखविले आहे.

कोष्टक क्र. ३.१

भूपर्जन्य गट १ अ मधील प्रमुख पिकांची निवड १९९०-९१

भू-पर्जन्य गट १ अ

| अ.नं. | पिकाचे नाव | पिकाखालील एकूण क्षेत्र हेक्टर | पिकाखालील क्षेत्राचे एकूण क्षेत्राशी प्रमाण % |
|---|---|---|---|
| १. | ख. ज्वारी | ५० | ७.१२ |
| २. | बाजरी | १० | १.४२ |
| ३. | इ. तृणधान्ये | - | - |
| ४. | भुईमूग | ७५ | १०.६९ |
| ५. | सुर्यफूल | ४ | ०.५६ |
| ६. | सोयाबीन | ७५ | १०.६९ |
| ७. | तुर | ३० | ४.२७ |
| ८. | मुग | २ | ०.२९ |
| ९. | उडीद | २ | ०.२९ |
| १०. | इ. कडधान्ये | ३० | ४.२७ |
| ११. | हरभरा | ५० | ७.१२ |
| १२. | गहू | ५० | ७.१२ |
| १३. | रब्बी ज्वारी | १०० | १४.२४ |
| १४. | करडई | ४ | ०.५६ |
| १५. | ऊस | १०५ | १४.९५ |
| १६. | द्राक्षे | ५५ | ७.८४ |
| १७. | फळबाग | ३५ | ४.९७ |
| १८. | पानवेल | २५ | ३.५६ |
| | एकूण .. | ७०२ | ९९.९६ |

आधार: प्रशिक्षण व भेट योजना सांगली, उपविभाग मिरज पिक उत्पादन आराखडा १९९०-९१.

A
11954

कोष्टक क्र.३.१ वरून असे दिसून येते की, गट अ मधील एकूण क्षेत्रफळापैकी सर्वाधिक क्षेत्रफळ म्हणजे १०५ हेक्टर क्षेत्र (१४.९५ टक्के) ऊस पिकाखाली आहे. त्याखालोखाल रब्बी ज्वारी १०० हेक्टर (१४.२४ टक्के), भुईमूग ७५ हेक्टर (१०.६९ टक्के) सोयाबीन ७५ हेक्टर (१०.६९%)आहे. अलीकडच्या काळात द्राक्षा बागायत क्षेत्रा वाढत असल्याचे दिसून येते.

कोष्टक क्र.३.२

भूमर्जन्य गट १ब मधील प्रमुख पिकांची निवड

| अ.नं. | पिकाचे नाव | पिकाखालील एकूण क्षेत्रा हेक्टर | पिकाखालील क्षेत्राचे एकूण क्षेत्राशी प्रमाण % |
|---|---|---|---|
| १. | ख. ज्वारी | १३० | १२.१७ |
| २. | बाजरी | - | - |
| ३. | इ. तृणधान्ये | २० | १.८७ |
| ४. | भुईमूग | १७५ | १६.३८ |
| ५. | सोयाबीन | १२५ | ११.७० |
| ६. | सुर्यफुल | ४ | ०.३७ |
| ७. | तूर | २० | १.८७ |
| ८. | मूग | ४ | ०.३७ |
| ९. | उडीद | ४ | ०.३७ |
| १०. | इ. कडधान्ये | १५ | १.४० |
| ११. | हरभरा | ७५ | ७.०२ |
| १२. | गहू | १२५ | ११.७० |
| १३. | करडई | ६ | ०.५६ |
| १४. | ऊस | २१५ | २०.१३ |
| १५. | द्राक्षे | २० | १.८७ |
| १६. | फळबागा | २० | १.८७ |
| १७. | पानवेल | ५ | ०.४६ |
| १८. | रब्बी ज्वारी | १०५ | ९.८३ |
| | एकूण .. | १०६८ | |

आधार : कोष्टक क्र. ३.१ प्रमाणेच.

कोष्टक क्र.३.२ वरून असे दिसून येते की, भूमर्जन्य गट १ब मध्ये ऊस लागवडी-

खालील क्षेत्र सर्वाधिक म्हणजे २१५ हेक्टर असून पिकाखालील एकूण क्षेत्राशी त्याचे प्रमाण २०.१३ टक्के आहे. उसाखालोखाल भुईमूग १७५ हेक्टर, सोयाबीन व गहू प्रत्येकी १२५ हेक्टर आहे. तर सर्वात कमी क्षेत्र उडीद, मूग, सुर्यफुलाखालील आहे. ते प्रत्येकी ४ हेक्टर आहे.

कोष्टक क्र.३.३

भूमर्जन्य गट १ क मधील प्रमुख पिकांची निवड ९०-९१

| अ.नं. | पिकाचे नाव | पिकाखालील क्षेत्र हेक्टर | पिकाखालील क्षेत्राचे एकूण क्षेत्राशी प्रमाण% |
|---|---|---|---|
| १. | ख. ज्वारी | २० | २.७२ |
| २. | बाजरी | ५ | ०.६८ |
| ३. | इ. तृणधान्ये | - | - |
| ४. | भुईमूग | १७५ | २३.८० |
| ५. | सोयाबीन | २ | ०.२८ |
| ६. | सुर्यफूल | ४ | ०.५५ |
| ७. | तूर | ४ | ०.५५ |
| ८. | मूग | ५ | ०.६८ |
| ९. | उडीद | २५ | ३.४० |
| १०. | इ. कडधान्ये | १५० | २०.४० |
| ११. | हरभरा | २० | २.७२ |
| १२. | गहू | - | - |
| १३. | रब्बी ज्वारी | ३०५ | ४१.५० |
| १४. | करडई | - | - |
| १५. | ऊस | २० | २.७२ |
| १६. | द्राक्षे | - | - |
| १७. | फळबागा | - | - |
| १८. | पानवेल | - | - |

आधार: कोष्टक क्र.३.१ प्रमाणेच

कोष्टक क्र.३.३ वरुन असे दिसून येते की, गट क्र. १ क मधील सर्वाधिक क्षेत्रफळ म्हणजे ३०५ हेक्टर (एकूण पिकाखालील क्षेत्राच्या ४१.५० टक्के) क्षेत्र रब्बी ज्वारीच्या पिकाखाली आहे. त्याखालोखाल १७५ हेक्टर भुईमूग व १५० हेक्टर इ. कडधान्य क्षेत्राखाली आहे.

कोष्टक क्र. ३.४

म्हैसाळ गावातील बागायत व जिरायत क्षेत्र

| अ.नं. | वर्ष | बागायत क्षेत्र | जिरायत क्षेत्र | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | १९६१ | १०५० | २०५० | ३१०० |
| २. | १९७१ | १५०० | १३०० | २८०० |
| ३. | १९८१ | १६२५ | ९०० | २५२५ |
| ४. | १९९१ | १८४० | ६८० | २५२५ |

आधार : ग्रामपंचायत म्हैसाळ कागदपत्रे

कोष्टक क्र. ३.४ मध्ये १९६१ ते ९१ या कालावधीतील बागायत व जिरायत क्षेत्र दर्शविले आहे. १९६१ मध्ये बागायत क्षेत्र १०५० हेक्टर होते ते १९९१ मध्ये १८४० हेक्टर होते. म्हणजेच बागायत क्षेत्रात ७९० हेक्टर वाढ झाली. याउलट जिरायत क्षेत्र १९६१ मध्ये २०५० होते ते १९९१ मध्ये ६८० झाले. म्हणजेच जिरायत क्षेत्र १३७० हेक्टर कमी झाले.

एकूण बागायत व जिरायत क्षेत्र १९६१ मध्ये 3100 हेक्टर होते. ते १९९१ मध्ये २५२५ हेक्टर झाले. याचा अर्थ एकूण (बागायत व जिरायत) क्षेत्रफळ १९६१ ते १९९१ या ३० वर्षांच्या कालावधीत कमी झाले.

कोष्टक क्र. ३.५

पीक रचना

| क्र.नं. | प्रमुख पिके | क्षेत्र हेक्टरमध्ये १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ |
|---|---|---|---|---|---|
| १. | ऊस | १०० | २५० | ४०० | ६५० |
| २. | द्राक्षे | - | ५ | ४० | ७५ |
| ३. | ज्वारी | २०० | ३५० | ४०० | ४५० |
| ४. | पानमळे | २ | ५ | २० | ३० |
| ५. | भात | ३० | ३५ | ३० | २५ |
| ६. | गहु | २ | २५० | ३०० | २७० |
| ७. | कडधान्ये | १५० | १७५ | १५० | १८० |
| ८. | भुईमूग | २०० | २७५ | ३०० | २५० |
| ९. | भाजीपाला | ५० | ५० | ५५ | ७५ |
| १०. | हरभरा | ३५ | ५० | ८० | १७५ |
| ११. | सोयाबीन | - | - | ५ | ५७५ |
| १२. | फळबागा | ५ | १० | १५ | ३० |

आधार : कोष्टक क्र. ३.२ प्रमाणेच.

कोष्टक क्र. ३.५ वरून असे दिसून येते की, १९६१ मध्ये भुईमूग व ज्वारी या दोन पिकाखाली सर्वाधिक क्षेत्र होते. ते प्रत्येकी २०० हेक्टर होते. त्याखालोखाल कडधान्ये १५० हेक्टर, ऊस १०० हेक्टर असा क्रम लागतो.

१९६१ ते १९९१ या कालावधीत ऊसाखालील क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली आहे. १९६१ मध्ये ऊसाखालील क्षेत्र १०० हेक्टर होते ते १९९१ मध्ये ६५० हेक्टर झाले. त्याखालोखाल ज्वारीच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाल्याचे दिसते. ६१ मध्ये हे क्षेत्र २०० हेक्टर होते. ९१ मध्ये ४५० हेक्टर

झाले. याशिवाय उल्लेखनीय बाब म्हणजे सोयाबिनखालील क्षेत्रात झालेली वाढ होय. १९८१ मध्ये सोयाबीन खालील क्षेत्रात ५ हेक्टर होते ते १९९१ मध्ये एकदम ५७५ हेक्टर झाले. ११५ पट वाढ झाली.

३.८ पशुपालन:

गावामध्ये शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात असल्याने शेतीला जोडधंदा म्हणून पशूपालन देखील केले जाते. बैल, गायी, म्हैशी, शेळ्या, मेंढ्या इ. जनावरे पाळली जातात. तसेच शेतीची कामे करण्यासाठी मानवी श्रम बैल, म्हैस, रेडा यांचा वापर करण्यात येतो. १९८१ च्या जनगणनेनुसार गावातील गुरांची संख्या आणि पशुंची संख्या ५०७५ इतकी आहे. धनगर समाज मोठा असल्याने शेळ्या मेंढयाही भरपूर प्रमाणात पाळल्या जातात.

खालील कोष्टकावरून त्यांची आकडेवारी मिळते.

कोष्टक क्र.३.६

पशुधन १९९०-९१ अखेर

| | गायी | म्हैशी | रेडा | बैल | शेळ्या | मेंढ्या | कोंबड्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ७५२ | १८७८ | २ | २० | ६५० | ६४३ | १६८० | ५६२५ |
| प्रमाण% | १३.३७ | ३३.३८ | ०.०३ | ०.३५ | ११.५५ | ११.४३ | २९.८८ | १००% |

आधार: ग्रामपंचायत म्हैसाळ कागदपत्रे.

याशिवाय प्रत्येकी १००० पक्षी असलेले चार कुक्कुट पालन केंद्रे आहेत.

३.९ वहातूक सेवा:

म्हैसाळ गाव रस्ता-वहातुक व रेल्वे वहातुकीने जोडले गेले आहे. विजापूर-अथणी रोडही गावावरून जातो. तसेच म्हैसाळ गाव मिरज शहरापासून जवळ

असल्यामुळे शहर वहातुक सोय आहे. महामार्गावर गाव असल्याने कर्नाटकात जाणाऱ्या बऱ्याच गाडया गावावरून जातात. शिवाय खाजगी ट्रक, टेम्पो, मोटॅडोर इ. वहाने यांच्या सुविधा उपलब्ध आहेत.

३.१० पोष्ट ऑफीस व तारखाने:

गावामध्ये पोष्ट ऑफीसचीही सोय आहे. तसेच टेलीफोनची देखील सोय आहे.

३.११ पाणीपुरवठा:

गावामध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा ग्रामपंचायतीमार्फत नळपाण्याद्वारे केला जातो. हा पाणीपुरवठा कृष्णा नदीतून केला जातो. तसेच विहिरीतील पाण्याचा पुरवठाही नळाद्वारे गावाला केला जातो. गावात दिवसातून दोन वेळा पाणीपुरवठा (पिण्याचा) केला जातो.

३.१२ आरोग्यसुविधा:

गावामध्ये एक प्राथमिक आरोग्य केंद्र, एक प्राथमिक आरोग्य उपकेंद्र तसेच कुटुंबनियोजन केंद्रही आहे. तसेच नोंदित असे चार खाजगी दवाखाने आहेत.

३.१३ ग्रामपंचायत:

१९५३ मध्ये ग्रामपंचायतीची स्थापना झालेली आहे. आपल्या ३०-३५ वर्षांच्या कारकिर्दीत सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न ग्रामपंचायतीने केला आहे. पाणीपुरवठा, दिव्यांची सोय, रस्ते दुरुस्ती, सांडपाण्यासाठी गटार योजना या मूलभूत सोयीबरोबरच इतर अनेक सुविधा ग्रामपंचायतीमार्फत केल्या जातात. ग्रामपंचायतीमार्फत गावात वृक्षारोपणाचा कार्यक्रमही राबविला जातो.

३.१४ <u>शैक्षणिक सोयी:</u>

गावामध्ये शिक्षणाची सोय उत्तम प्रकारची आहे. बालवाड्यांची संख्या ११ आहे. प्राथमिक शिक्षणासाठी जिल्हा परिषदेमार्फत दोन प्राथमिक शाळा आहेत. जिल्हा परिषद मुलांची शाळा व जिल्हा परिषद मुलींची शाळा अशी त्यांची नावे आहेत. मुलांची संख्या ५९४ असून मुलींच्या शाळेतील विद्यार्थिनी संख्या ५५२ आहे. शिवाय दोन हायस्कूलस् असून त्यापैकी एक रयत शिक्षण संस्थेचे मुला-मुलींसाठी एकत्रित स्वरुपाचे आहे. त्याची स्थापना १९५९ साली झाली आहे. एकूण विद्यार्थीसंख्या १०५० आहे. दुसरे हायस्कूल फक्त मुलींच्यासाठी आहे. शिवाय रयत शिक्षण संस्थेच्या हायस्कूलला जोडून उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय केलेली आहे. गावामध्ये एक इंग्रजी माध्यम हायस्कूल आहे. याशिवाय महाविद्यालयीन शिक्षणासाठी मिरज व सांगली याठिकाणी विद्यार्थी विद्यार्थीनी जातात.

३.१५ <u>सहकार चळवळ:</u>

गावातील इतर विकासाबरोबरच सहकारी चळवळीचा विकास झालेला आहे. सहकारी पतसंस्था, सहकारी बँका, दुग्ध सहकारी संस्था, संयुक्त सहकारी शेती संस्था इ. सहकारी संस्था आहेत. त्यांची माहिती खालीलप्रमाणे <u>श्री विठ्ठल संयुक्त सहकारी शेती संस्था म्हैसाळ:</u>

या संस्थेची स्थापना १ जानेवारी १९६९ ह्या दिवशी झाली. या संस्थेचे संस्थापक कै. मधुकररावजी देवल होते.

आज या संस्थेचे ८० च्या वर सभासद आहेत आणि सुमारे ७० एकर क्षेत्र लागवडीखाली आहे. संस्थेची सुमारे १२ लाख रुपयांची स्थिर भांडवलाची गुंतवणूक आहे. सीडलेस, ऑपसेन, द्राक्षे, ऊस, गहू, ज्वारी, हळद, करडई, भाजीपाला इ. पिके घेतली जातात. द्राक्ष बागायत आज १७ एकरांवर आहे.

संस्थेचा सालीना व्यवहार सुमारे रु. ८ ते १० लाखांचा आहे. दुधाचे उत्पादन आणि शेतीची सुधारणा ह्यांमधून विठ्ठल सोसायटीच्या सभासदांच्या उत्पन्नात चांगली भर पडली आहे. १९८५-८६ साली केलेल्या एका पहाणीत सभासदांमध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे हाताच्या बोटावर मोजण्याइतकीसुध्दा नाहीत.

## सामाजिक विकास:

विठ्ठल सहकारी संस्थेच्या आर्थिक प्रगतीबरोबरच सामाजिक प्रगतीदेखील झाली आहे. संस्थेमार्फत व्यायाममंडळ, महिला मंडळ, अभ्यासिका चालविली जाते. वर्षातून वेगवेगळी शिबीरे घेतली जातात. उदा. आरोग्य शिबीर, श्रमदान शिबीर इ. याशिवाय स्वच्छतेच्या स्पर्धा, सुदृढ बालक स्पर्धा घेतल्या जातात.

थोडक्यात सर्व दृष्टीनी एक आदर्श सहकारी शेती संस्था या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रात ही संस्था प्रसिध्द आहे.

## सहकारी व व्यापारी बँका:

गावामध्ये सहकारीव व्यापारी बँकांच्या शाखा आहेत त्या खालीलप्रमाणे-

| | | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १) | सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली | १९६९ |
| २) | सांगली अर्बन को-ऑप बँक लि. सांगली | १९७२ |
| ३) | यशवंत सहकारी बँक लि. म्हैसाळ | १९८३ |
| ४) | श्री. लक्ष्मी सहकारी बँक लि. म्हैसाळ | १९८४ |
| ५) | युनियन बँक ऑफ इंडियाय | १९८४ |
| ६) | दि रत्नाकर बँक लि. सांगली | १९७१ |

तसेच गावात खालील पतसंस्था कार्य करीत आहेत.

| पतसंस्था | | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १) | आबासाहेब शिंदे नागरी सहकारी पतसंस्था | १९८४ |
| २) | शेतकरी नागरी सहकारी पतसंस्था | १९८४ |
| ३) | वसंतदादा नागरी सहकारी पतसंस्था | १९८९ |
| ४) | कुमुदिनी नागरी सहकारी पतसंस्था | १९९० |
| ५) | मोहनराव शिंदे नागरी सहकारी पतसंस्था | १९९० |
| ६) | रावसाहेब शिंदे नागरी सहकारी पतसंस्था | १९९० |

याशिवाय आबासाहेब शिंदे सर्वसेवा सहकारी सोसायटी लि. म्हैसाळ (स्थापना १९७३) व वसंत सर्वक्षेत्रा सहकारी सोसायटी लि. म्हैसाळ (स्थापना १९७३) या दोन प्रमुख सर्वसेवा सहकारी संस्था आहेत. त्यांच्या कापड, खत, दुध, पतसंस्था, स्वस्त धान्य दुकान इ. शाखा आहेत. तसेच मधुकरराव, देवल दुध पुरवठा सहकारी संस्थाही कार्यरत आहे.

३.१६ विद्युतपुरवठा:

गावामध्ये विद्युत पुरवठ्याची देखील सोय आहे. ही सोय घरगुती, शेती, कुटीरोद्योग इ. सर्व कारणासाठी उपलब्ध आहे.

३.१७ जलसिंचन:

म्हैसाळ गावामध्ये शेतीमध्ये जलसिंचनाची सुविधा आहे. ही सुविधा विहरीमार्फत व नदीच्या पाण्याद्वारे केलेली आहे. गावातील जलसिंचन विहीरींची संख्या २६१ आहे. तसेच नदीवर खाजगी पंपसेटची सोय केलेली आहे. विहीरीद्वारे ४२९ हेक्टर क्षेत्रा ओलिताखाली आलेले आहे.

१९८१ च्या जनगणनेनुसार ३७ हेक्टर इतके क्षेत्रा विद्युत मोटारी नसलेल्या विहीरीमार्फत जलसिंचीत होते. तर १२० हेक्टर क्षेत्रा विद्युत मोटारी बसविलेल्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विहीरीमार्फत ओलिताखाली होते. ९१ हेक्टर इतके क्षेत्र नदीमार्फत ओलिताखाली आलेले होते. १४७८ हेक्टर क्षेत्राला जलसिंचनाची सोय नव्हती.

कोष्टक क्र.३.७

जलसिंचन योजना

| अ.नं. | योजनेचे नाव | स्थापना | प्रत्यक्षात चालू | योजनेचे सिंचन क्षेत्र एकर | सभासद |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री धनलक्ष्मी लिफ्ट इरिगेशन स्कीम नं. १ | १९५८ | १९६९ | ७९० | २२५ |
| २) | महावीर लिफ्ट इरिगेशन स्कीम नं. २ | १९६५ | १९६६ | २५२ | १०५ |
| ३) | श्री. केदारलिंग लिफ्ट इरिगेशन स्कीम नं.३ | १९६५ | १९६९ | २०० | ४० |
| ४) | श्री. कनकेश्वर लिफ्ट इरिगेशन स्कीम नं.४ | - | - | २०० | ५० |
| ५) | सरस्वती लिफ्ट इरिगेशन स्कीम नं. ५ | १९६६ | १९६७-६८ | १५०० + १००० | ५०० |
| ६) | वसंतदादा सहकारी साखर कारखाना लि. सांगली स्कीम नं. ६ व ७. | १९८५ | ८५-८६ | ४०० | - |
| ७) | खाजगी बिरदेव इरिगेशन | १९७३ | - | ६० | ४० |

आधार : संबंधित संस्थांचे कागदपत्रे

कोष्टक क्र. ३.७ वरुन असे दिसून येते की, म्हैसाळ गावामध्ये एकूण ७ जलसिंचन योजना असून त्यांच्या मार्फत एकूण ४४०२ एकर जमीन कमांड एरियाखाली येते. तसेच सर्व योजनांचे मिळून एकूण सभासद ९६० आहेत.

३.१८ तंत्रज्ञान:

म्हैसाळ गावामध्ये अगदी अलीकडच्या कालावधीपर्यंत शेती पारंपारिक पध्दतीने

केली जात होती. शेतीच्या मशागतीसाठी पारंपारिक साधने वापरली जात होती. उदा. पेरणीसाठी कुरी, कोळपण्यासाठी कोळपी इ. याशिवाय मनुष्यबळ व बैलांचा वापर मोठा प्रमाणात केला जात होता. परंतु अलीकडे यामध्ये बदल झालेला दिसतो. साखर कारखाना, हरितक्रांती इ. चा परिणाम शेती तंत्रामध्येही झालेला दिसतो. ट्रॅक्टर, मळणी मशीन, याशिवाय इतर अनेक आधुनिक साधने वापरली जातात. सधन शेतकरी या साधनांचा अधिक प्रमाणात वापर करतात. त्यांचा प्रभाव इतर शेतकऱ्यांवरही झालेला आहे. तेही या साधनांचा वापर करु लागले आहेत.

गावामध्ये एकूण ३० ट्रॅक्टर्स आहेत. याशिवाय मळणी मशीनही वापरले जाते. वीजेवर चालणारे पंपदेखील विहीरीवर बसविलेले आहेत.

३.१९ लोकसंख्या:

म्हैसाळ गावच्या लोकसंख्येत देखील सतत वाढ होत गेल्याचे दिसते. कोष्टक क्र. ३.८ वरून १९६१- ते १९९१ या कालावधीतील लोकसंख्येच्या वाढीचे स्वरुप दिसून येते.

कोष्टक क्र. ३.८

म्हैसाळ गावातील लोकसंख्येचे लिंगभेदानुसार वर्गीकरण

| अ.नं. | सन | पुरुष | शे.प्रमाण | स्त्रिया | शे. प्रमाण | एकूण लो.संख्या | वार्षिक वाढीचा वेग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९६१ | ३०९० | ५१.१७ | २९४९ | ४८.८३ | ६०३९ | - |
| २. | १९७१ | ४४८२ | ५२.१५ | ४११३ | ४७.८५ | ८५९५ | ४.२३ |
| ३. | १९८१ | ५६८५ | ५१.८५ | ५२७९ | ४८.१५ | १०,९६४ | २.७६ |
| ४. | १९९१ | एन्.ए. | - | एन्.ए. | - | १५,०९८ | ३.७७ |

आधार : सेन्सस ऑफ इंडिया (सांगली जिल्हा)

प्रकाशक - दी डायरेक्टर गव्हर्मेंट प्रिन्टींग स्टेशनरी अँन्ड पब्लिकेशनस् महाराष्ट्र स्टेट बॉम्बे, १९६४, ७२, ८५.

कोष्टक क्र. ३.८ वरून असे दिसून येते की, १९६१ ते १९९१ या तीस वर्षांच्या काळात लोकसंख्येत ९०५९ इतकी वाढ झाली आहे. तसेच १९६१ मध्ये पुरूष लोकसंख्येचे शे. प्रमाण ५१.१७ तर स्त्री लोकसंख्येचे शेकडा प्रमाण ४८.८३ होते. हेच प्रमाण १९८१ मध्ये अनुक्रमे ५१.८५ व ४८.१५ झाले. म्हणजेच पुरूष लोकसंख्येचे प्रमाण ०.६८ टक्क्यानी वाढले. तर स्त्री लोकसंख्येचे प्रमाण ०.६८ टक्क्यानी कमी झाले. तसेच १९६१ ते १९७१ या दहावर्षातील वाढीचा वेग ४.२३ होता तर १९८१ ते १९९१ या कालवधीत वार्षिक वाढीचा वेग ३.७७ झाला.

## कोष्टक क्र. ३.९

## साक्षरतेनुसार लोकसंख्येचे वर्गीकरण

| अ.नं. | काळ | स्त्रिया | शे. प्रमाण | पुरूष | शे. प्रमाण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९६१ | ४९२ | २७.५७ | १२९२ | ७२.४३ | १७८४ |
| २. | १९७१ | ९१७ | २९.४९ | २१९३ | ७०.५१ | ३११० |
| ३. | १९८१ | १६०२ | ३४.०४ | ३१०४ | ६५.९६ | ४७०६ |

आधार: कोष्टक क्र. ३.८ प्रमाणेच.

कोष्टक क्र. ३.८ वरून असे दिसून येते की, १९६१ मध्ये ४९२ (२७.५७ %) स्त्रिया साक्षर होत्या व १२९२ (७२.४३ टक्के) पुरूष साक्षर होते. हेच प्रमाण १९८१ मध्ये स्त्रिया १६०२ (३४.०४ टक्के) व पुरूष ३१०४ (६५.९६%)

इतके झाले. म्हणजेच १९६१ ते १९८१ या दरम्यान स्त्रीसाक्षरतेचे प्रमाण ६.४७ टक्क्यानी वाढले. पुरूष साक्षरतेचे प्रमाण ६.४७ टक्क्यानी कमी झाले. तरीसुध्दा पुरूष साक्षरतेचे शेकडा प्रमाण जास्त आहे.

गावातील इतर उल्लेखानिय गोष्टी:

गावामध्ये कृष्णा - कोयना उपसा जलसिंचन योजना राबविली जाते. कृष्णा नदीवर धरण बांधलेले आहे. म्हैसाळ गाव सर्कशीचे आगार म्हणूनही ओळखले जाते. याशिवाय मत्स्यबीज संवर्धन प्रकल्प राबविला जातो.

याशिवाय सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमही केले जातात. गावामध्ये सहा भजनी मंडळे आहेत. त्यांचे कार्यक्रम गावात तसेच इतरत्राही केले जातात. गावामध्ये विविध धर्माची आठ मंदीरे आहेत.

गावामध्ये सर्व प्रकारची वर्तमानपत्रे येतात. १९८१ च्या जनगणनेनुसार दैनिकाच्या ६० प्रती गावात येत होत्या. तसेच गावात ३१ मोटार सायकल्स् २२ ट्रक्टर्स होते. ३० कार होत्या.

......